# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५०७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१५/०८/२०१६.

**१) ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे ,एक जखमी . :–**

दिनांक १४/०८/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक मध्ये पाईप भरुन जात असतांना पाईपला दोर बरोबर न बांधता हयगयीने, निष्काळजीपणे पाईपला बांधलेला दोर तुटुन पाईप जखमी फिर्यादीचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ क्यु २३५३ वर पडल्याने फिर्यादी हा एनएच ६ रोड रनतभंवर हॉटेल समोर भंडारा रोडवर पडुन जखमी झाल्याने जखमीचे बयान व डॉ रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. दांदळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) ट्रकची मोटार सयकलला धडक लागुन मोटार सायकलचे नुकसान झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०८/२०१६ रोजी १४.०० वा. वा. दर. यातील फिर्यादी गजानन पुडंलीक प्रधान वय ४२ वर्ष, रा. नागपुर हा लाखांदुर कडुन अंतरगावकडे आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ३१ डीटी ३१३३ ने जात असता मोटार सायकलचे समोर असलेला यातील आरोपी ट्रक चालकाने आपला ट्रक अचानक थांबवुन मागे घेतल्याने ट्रकची मोसाला धडक होवुन मोटार सायकलची १०,०००/–रु. ची नुकसान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,४२७ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. निंबकरे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १४/०८/२०१६ रोजी १२.००ते १२.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील काळी पिवळी गाडी क्र. एमएच ३१ एबी ८२८५ ही सार्वजनीक ठिकाणी रस्त्यावर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका पोहचेल अशा स्थितीत उभी करून मिळुन आल्याने पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. अंबादे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १५/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०२ केस, तिन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व इतर वाहनांवरती १२७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

( श्री.एस. टी. घुसर )
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६९९९९९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.